# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२० दि. २० मार्च,२०२०

जळगाव दि. २० (प्रतिनिधी) कोरोनो विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने आवश्यक त्या खबरदारीच्या उपाययोजना हाती घेतल्या असून त्याचाच एक भाग म्हणून रासायनिकशास्त्र प्रशाळेने सॅनिटायझर तयार केले आहे. विद्यापीठात येणाऱ्या सर्व अभ्यागतांना व कर्मचाऱ्यांना प्रवेश करतांना स्वच्छ करण्यासाठी ते उपलब्ध् करुन दिले जात आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग, महाराष्ट्र शासन आणि उच्च् व तंत्र शिक्षण विभाग यांच्या निर्देशानुसार विद्यापीठ कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्‍ करीत आहे. प्रशाळांमधील विद्यार्थ्यांना दि.३१ मार्च पर्यंत सुट्या जाहीर केल्या आहेत तर प्राध्यापकांना घरी राहून कामकाज करण्याची मुभा दिली आहे. शुक्रवार पासून विद्यापीठात अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी ५० टक्के उपस्थिती अंमलात आणली गेली आहे. याशिवाय विद्यापीठात हायवेलगतच्या मुख्य प्रवेशव्दाराकडूनच सर्वांना प्रवेश दिला जात आहे. तसेच प्रशासकीय इमारतीमध्ये प्रवेश करतांना इमारतीच्या मुख्य प्रवेशव्दारामधूनच प्रवेश दिला जात आहे. मुलांच्या वसतिगृहाकडील प्रवेशव्दार सकाळ व संध्याकाळी केवळ एक तास खुले ठेवण्यात येते.

विद्यापीठाच्या रासायनिकशास्त्र प्रशाळेने सॅनिटायझर निर्मितीसाठी स्व्त: पुढाकार घेतला आहे. जागतिक आरोग्या संघटनेच्या निर्देशानुसार कमी किंमतीत सहज उपलब्ध होणारे स्थानिक हॅण्ड सॅनिटायझर या प्रशाळेने तयार केले आहे. त्यामध्ये इझोप्रोपाईल अल्कोहोल, हायड्रोजन पेरॉक्साईड, ग्लिसरॉल आणि पाणी यापासून हे सॅनिटायझर तयार करण्यात आले आहे. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील, प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, प्रभारी कुलसचिव प्रा.बी.व्ही.पवार आणि प्रशाळेचे संचालक

प्रा.डी.एच.मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.व्ही.व्ही.गिते, डॉ.योगेश वाघ, अशोक शिंपी यांनी हे सॅनिटायझर तयार केले. गरजेनुसार हे अधिकचे तयार केले जाईल. प्रत्येक प्रशाळा आणि प्रशासकीय विभागात 250 मि.ली.ची बाटली उपलब्ध् करुन दिली आहे. विभागात जाण्यापूर्वी या सॅनिटायझरने हात स्वच्छ केल्यानंतर प्रवेश दिला जातो. याशिवाय विद्यापीठाने जनजागृतीचा एक भाग म्हणून प्रशाळा आणि दर्शनी भागात 25 बॅनर तयार करुन ठिकठिकाणी लावले आहेत. या बॅनरची सॉफ्ट कॉपी संलग्नित सर्व महाविद्यालयांना पाठविण्यात आली असून महाविद्यालयांनी देखील हे बॅनर दर्शनी भागात लावावे असे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

-----------------------------------------------------------------------------------------

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

कृपया, आपल्या लोकप्रिय दैनिकात उपरोक्त बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी